

मिरज : युवा महोत्सवातील विजयी संघांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

# मिरजेच्या युवा महोत्सवात १७८ महाविद्यालयांचा सहभाग

**मिरज : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात १७८ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. ही आजवरची विक्रमी नोंदणी आहे. येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात महोत्सवाची शनिवारी सांगता झाली. यानिमित्ताने भव्य शोभायात्रा काढण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

स्पर्धेचा अंतिम निकाल असा : सरदार बाळासाहेब माने लोककला फिरता चषक : बळवंत कॉलेज (विटा), सरदार दादासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक : मुधोजी कॉलेज (फलटण), विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरता गौरव चषक : नृत्य विभाग : मुधोजी कॉलेज (फलटण), बळवंत कॉलेज (विटा), नाट्य विभाग : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), संगीत विभाग : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), कला विभाग : सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), वाङ्मय विभाग : राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे), वैयक्तिक स्पर्धा सर्वसाधारण उपविजेतेपद फिरता चषक : दि न्यू कॉलेज (कोल्हापूर), प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), सांघिक स्पर्धा सर्वसाधारण उपविजेतेपद फिरता चषक : मुधोजी कॉलेज, अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर).

पुढारी MY कोल्हापूर
रविवार, २१ सप्टेंबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालयातील सेमिनारला प्रतिसाद

**कोल्हापूर :** अभियांत्रिकी दिनानिमित्त विवेकानंद कॉलेजमध्ये सिनिअर इलेक्ट्रॉनिक्स विभाग व बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स एन्टायर विभागातर्फे आयक्यूएसी विभागाच्या सहकार्याने आयओटी व एआयच्या युगात एम्बेडेड सिस्टीम डिझाईन या विषयावर सेमीनार झाला. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. एस. ए. शिंदे उपस्थित होते. विशेष वक्ते म्हणून कौन्सिलर पुणे, राहुल हिवरे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते. इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. सी. बी. पाटील यानी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. पी. आर. बागडे यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. पी. एस. जाधव यांनी केले. प्रा. जी. बी. जिरगे यांनी आभार मानले.

# कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजला सांघिक सर्वसाधारण विजेतेपद

## शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप; १७८ महाविद्यालयांनी नोंदवला सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**मिरज :** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात सुरु असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ४५ वा मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप शनिवारी झाला. कोल्हापूरच्या स्वामी विवेकानंद महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. फलटणच्या मुधोजी महाविद्यालयास उपविजेतेपद मिळाले. वैयक्तिक स्पर्धेतील उपविजेतेपद कोल्हापूरच्याच न्यू कॉलेजने पटकावले. प्रमुख पाहुणे कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के, अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

यावेळी प्रा. शिर्के म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या कलेला व सुप्त गुणांना झळाळी देण्याचे कार्य युवा महोत्सव करतो. हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना जीवनात खूप पुढे नेते, असे उद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के यांनी काढले. ते म्हणाले, युवा महोत्सवाचे शिवधनुष्य साळुंखे महाविद्यालयाने पेलले. यावर्षी विक्रमी १७८ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. जिल्हास्तरीय स्पर्धा घेणाऱ्या सर्व महाविद्यालयांचे योगदान आहे.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. विद्यापीठ गीताने व संस्थेच्या प्रार्थनेने समारोप सोहळ्याचा प्रारंभ झाला. यंदा प्रथमच झालेल्या शोभायात्रा स्पर्धेत १५ महाविद्यालयांनी 'पंढरीची वारी', 'आदिवासी नृत्य', 'जात-धर्म निरपेक्ष संस्कृती', 'जगात भारी कोल्हापुरी' या विषयांवर सादरीकरण केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन चव्हाण, प्रज्ञा माळकर व डॉ. टी. एम. चौगले यांनी मनोगत व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग व डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय यांच्यातर्फे संयोजन करण्यात आले. प्रा. अर्जुन जाधव, डॉ. स्वाती हाके यांच्यासह सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.



मिरजेतील साळुंखे महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचा समारोप झाला. कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विजेत्या विवेकानंद महाविद्यालयाच्या संघाला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे उपस्थित होते.